# मुंबई पोस्टल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड

जी. पी. ओ. बिल्डींग, तळमजला, मुंबई - ४०० ००१.

कार्यालय दूरध्वनी क्र. : २२०६ ०४१३, २२६९ ४१७२, २२६९ ४०४१


## प्रांजळ पार्क, मळवली स्टेशन जवळ, मळवली, ता. मावळ, जिल्हा पुणे येथील विश्रामगल्हृ रूम आरक्षित करण्यासंबंधी अर्ज

अर्ज क्र. :________________

प्रति,
मानद सचिव
मुंबई पोस्टल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.
जी. पी. ओ. बिल्डींग , तळमजला,
मुंबई - ४०० ००१.

महोदय/ महोदया,

मी आपल्या सोसायटीचा सभासद असून मला आपल्या मळवली येथील विश्रामगृहामध्ये एक लहान/मोठी रुम/ हॉल दि.________________ ते दि.________________ (        ) दिवस उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.

नाव :- श्री / श्रीमती ________________________________

कार्यालय :- ________________________________

सभासद क्र. :- ________________ भ्रमणध्वनी क्र.:- ________________

| अ. क्र. | कुटुंब सदस्यांचे नांव | नाते | पु/स्त्री | वय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

उपरोक्त व्यक्ती माझ्या कुटुंब सदस्य आहेत.
विश्रामगृह वास्तव्य-वापराविषयी या अर्जाच्या मागील पानावर छापलेले सर्व नियम व सूचना मी वाचल्या असून त्या मला मान्य व बंधनकारक आहेत. विश्रामगृहात राहत असताना विश्रामगृहाच्या मालमत्तेचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास मी त्यास जबाबदार राहीन आणि झालेल्या नुकसानाची भरपाई करून देणे मला बंधनकारक राहील.

________________
सभासदाची सही

दिनांक :-

---

### कार्यालयीन उपयोगाकरीता

श्री / श्रीमती ________________ कार्यालय ________________

यांना रूम क्र. ________________ देण्यात येत आहे.

दि.________________ ते दि.________________ (        ) दिवस .

भाडे रू.________________ व अनामत रक्कम रू. ________________दिले. पावती क्र. ________________

दि.________________

लिपीक

पर्यवेक्षक

मानद सचिव
मुंबई पोस्टल को.ऑ.सो.लि.

# विश्रामगृह आरक्षण वापराबाबत नियमावली (सभासदांच्या माहितीसाठी)

१. मळवली येथील विश्रामगृहामध्ये फक्त सोसायटीच्या सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना राहता येईल.
२. एका सभासदाला फक्त एकच रुम आरक्षित करता येईल.
३. विश्रामगृहामधील आरक्षण व इतर सर्व कामकाज सोसायटीच्या मुंबई कार्यालयातून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केले जाईल.
४. प्रथम आलेल्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर आरक्षण होईल. आरक्षण नाकारण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापकीय मंडळाने राखून ठेवलेला आहे. याबाबतीत व्यवस्थापकीय मंडळाचा निर्णय अंतिम राहील.
५. विश्रामगृहामधील आरक्षण कमाल दोन दिवसांसाठी असेल. आरक्षित केलेल्या दिवसापेक्षा जास्त दिवस राहावयाचे असल्यास सोसायटीच्या मुंबई कार्यालयातून परवानगी घ्यावी लागेल. विश्रामगृहातील केअर टेकरकडून परस्पर मुदत वाढवून मिळणार नाही.
६. विश्रामगृहाचे रुमचे राहण्याचे भाडे प्रत्येक दिवसासाठी लहान रुम रु. ५००/- अधिक अनामत रक्कम रु.५००/- व मोठा रुम रु. ७००/- अधिक अनामत रक्कम रु. ७००/- हॉल रु. १२००/- अधिक अनामत रक्कम रु.१२००/- याप्रमाणे आरक्षण करण्यासाठी सोसायटीच्या कार्यालयात अगाऊ भरावयाचे आहेत.
७. सभासदास आरक्षण केल्यानंतर सोबत आरक्षण पावतीच्या दोन प्रती देण्यात येतील. त्यापैकी एक प्रत सभासदाने केअर-टेकरकडे जमा करणे बंधनकारक आहे.
८. सभासदास रूम सोडतेवेळी विश्रामगृहाचे केअर-टेकरकडून अतिरिक्त वापरण्यात आलेल्या वस्तूंची दर आकारणी तसेच काही नुकसान झाल्यास त्याची दर आकारणीसहीत नोंद करून एक प्रमाणपत्राची प्रत दिली जाईल. सदर प्रत सोसायटी कार्यालयात जमा केल्यानंतरच अनामत रक्कम परत देण्यात येईल.
९. आरक्षण ८ दिवस अगोदर रद्द करणाऱ्या सभासदाच्या एकूण भाड्याच्या २० टक्के व आरक्षण एक दिवस अगोदर रद्द केल्यास ५० टक्के रक्कम कपात केली जाईल. आरक्षण तारखेनंतर रद्द केल्याचे कळविल्यास पैसे परत मिळणार नाहीत.
१०. राहण्याचा दिवस सकाळी ९ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ९ पर्यंत असेल मुदत संपल्यानंतर रूम सभासदाने कोणत्याही परिस्थितीत सोडणे अनिर्वाय आहे.
११. सभासदाने त्यांच्या नावे असलेली रूम ताब्यात घेण्यासाठी व केअर-टेकरच्या ताब्यात देण्यासाठी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. सोबत खात्याचे ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे.
१२. सभासदाने आरक्षण केलेल्या रूममध्ये स्वतः राहणे आवश्यक आहे. आरक्षण अहस्तांतरणीय आहे.
१३. सभासदाने विश्रामगृहाच्या वास्तव्य काळात स्वतःचे खात्याचे ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.
१४. विश्रामगृह परिसरात स्वच्छता ठेवणे नितांत आवश्यक आहे.
१५. विश्रामगृहामध्ये मद्यप्राशन, धुम्रपान करणे यांस सक्त मनाई आहे. सभासद किंवा कुटुंबियांकडून असे गैरवर्तन आढळून आल्यास सदर सभासदास तदूनंतर या सुविधेचा लाभ देणे कायमचे बंद होईल.
१६. सभासदांना विश्रामगृहामध्ये पाळीव प्राणी घेऊन येण्यास सक्त मनाई आहे.
१७. विश्रामगृहामधील विजेचा व पाण्याचा आवश्यक तेवढाच काटकसरीने वापर करावा. आवश्यक नसेल तेव्हा विजेच्या उपकरणाची स्वीचेस बंद ठेवावीत.
१८. सभासदांने आपल्या वस्तूंची काळजी घ्यावी. सभासदांच्या कोणत्याही नुकसानीबाबत तसेच भारनियमनास सोसायटी जबाबदार राहणार नाही.
१९. विश्रामगृहात राहत असताना कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित सभासदांच्या (ज्यांच्या नावे आरक्षण आहे) अनामत रकमेतून सदर नुकसान भरपाईची रक्कम वळती करुन घेण्यात येईल.
२०. विश्रामगृहामधील सोसायटीच्या मालमत्तेच्या देखरेखीसाठी केअर-टेकरची नियुक्ती केलेली असून सभासद नेमून दिलेल्या कामासाठी त्याची मदत घेऊ शकतो.
२१. सोसायटीच्या कार्यालयामधून आरक्षण भाडे भरल्याची रितसर पावती मिळाल्यानंतरच आरक्षण गृहित समजावे.
२२. वरील नियमांत बदल/दुरूस्ती करण्याचे सर्व अधिकार संचालक मंडळाकडे राहतील.

☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆